*Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,*
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, JULY-AUG, 2018, VOL- 6/46*

# स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विदयार्थांना ऑनलाईन पध्दतीने अध्ययन करतांना येणाऱ्या समस्यांचा आभ्यास

**सुहास पाठक[1], Ph. D. & दादासाहेब पवार[2], Ph. D.**

*[1]साहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.*

*[2]साहाय्यक प्राध्यापक, ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र, महाविदयालय सोयगाव जि औरंगाबाद.*

**Abstract**

*स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विदयार्थांना ऑनलाईन पध्दतीने अभ्यास करताना नेट सुविधा, आवाज, डोळयाचे आजार, कानाचे आजार, मानसिक अस्थिरता, इत्यादी समस्या जाणवतात. सदरील संशोधनात स्पर्धा परीक्षेचा ऑनलाईन पध्दतीने आभ्यास करताना विदयार्थांना येणाया समस्याचा आभ्यास करण्यात आलेला आहे .सदरील संशोधनात औरंगाबाद जिल्यातील इयत्ता 10 वी नंतर पदयूत्तर स्तरापर्यंत शिक्षण घेणारे व स्पर्धा परीक्षेची तयारी* ***करणाऱ्या*** *विदयार्थाचा सामावेश करण्यात आला आहे. ज्यामध्ये औरंगाबाद जिल्यातील सर्व तालुक्यातील शहरी भागातील 40 विदयार्थी व ग्रामीण भागातील 40 विदयार्थाची निवड करून माहीती संकलन केले आहे .नमुन्याची निवड असंभव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतूक नमुना पध्दतीने केली आहे. तसेच संशोधन कार्य करण्यासाठी वर्णानात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करून माहीती संकलन विश्लेषण व निष्कर्षाची मांडणी केली आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1.0 प्रस्तावना

विविध अभ्यासकमाचे प्रवेश आणि वेगवेळया शासकीय सेवांच्या पदभरतीसाठी विविध प्रकारच्या परीक्षा आयोजित केल्या जातात. आज स्पर्धा परीक्षेची तयारी व अभ्यास करण्यासाठी विदयार्थी वेगवेगळया माध्यमातून अध्ययन करण्याचा प्रयत्न करतात. MPSC, UPSC, NET, SET, स्टॉफ सलेक्सन, विविध प्रवेश परीक्षा, पोलीस शिक्षक, ग्रामसेवक इत्यादी विविध परीक्षा देण्यासाठी विदयार्थी मेहनत करतात त्यामूळे स्वताःचे भविष्य सुरक्षीत होईल त्यासाठी प्रयन्न करतात. आज स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ऑनलाईन अध्ययन सांधनाचा मोठया प्रमाणात उपयोग विदयार्थी करतात. UPSC सारख्या देशातील सर्वात मोठया स्पर्धात्मक परीक्षेत अभिव्यती ही वेगाने,अचूक

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शब्दास करावी लागते त्यासाठी विदयार्थी रात्र दिवस अभ्यास करतात.विदयार्थी ऑनलाईन साधनाच्या माध्यमातून लेखी परीक्षा मुलाखत इत्यादी अभ्यास करतात.

शिक्षणाचे तीन प्रमुख घटक असतात अध्ययन, अध्यापन आणि मुल्यमापन. आज हे तिन्ही घटक ऑनलाईन पध्दतीने केले जात आहे .ज्याचा फायदा स्पर्धा परीक्षेच्या तयारी **करणा**ऱ्या विदयार्थानाही मिळत आहे .आज विदयार्थी वर्गात बसून ऑनलाईन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील तज्ञ शिक्षकाचे मार्गदर्शन घेऊ शकतात. आज कोणताही विषय शिकण्यासाठी आजच्या ऑनलाईन जगात मोठया प्रमाणात ज्ञान स्त्रोत उपलब्ध आहे.आज विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विदयार्थी ऑनलाईन पध्दतीने अभ्यास करतात त्यांना ऑनलाईन अध्ययन करताना कोणत्या समस्या येतात त्याचा अभ्यास सदरील संशोधनात करण्यात आला आहे .

**2.0 सशोधनाची ग्रहीतके**

1 इयत्ता 10 वी नंतर बरेच विदयार्थी नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करतात.

2 इयत्ता 10 वी ते पदयूतर स्तरावरील बरेच विदयार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात .

3 स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्a विदयार्थांना ऑनलाईन पध्दतीने अभ्यास करताना काही समस्या येतात.

4 स्पर्धा परीक्षेची तयारी विदयार्थी विविध माध्यमातून करतात.

**3.0 संशोधनाची उदिष्टे.**

1 इयत्ता 10 वी नंतर स्पर्धा परीक्षेची तयारी **करणा**ऱ्या विदयार्थाच्या ऑनलाईन पध्दतीने अध्ययन करणाऱ्या साधनांची माहीती घेणे.

2 स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विदयार्थाना ऑनलाईन पध्दतीने अभ्यास करताना येणाया समस्यांचा आभ्यास करणे.

3 स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विदयार्थाना ऑनलाईन पध्दतीने अभ्यास करताना येणाया समस्याच्या कारणाचा अभ्यास करणे.

4 स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विदयार्थाना ऑनलाईन पध्दतीने अभ्यास सहज व सुलभ करण्यासाठी उपाययोजना सुचवीने .

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**4 .0 सशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

औरंगाबाद जिल्यातील इयत्ता 10 वी नंतर ते पदयूतर स्तरापर्यंत शिक्षण घेणारे व स्पर्धा परीक्षेचे तयारी करणारे ग्रामीण व शहरी भागातील विदयार्थाचा सामावेश सदरील संशोधनात करण्यात आलेला आहे .

**5 .0 सशोधन पध्दती**

सशोधन करणाया प्रमुख तीन पध्दती आहे . सदरील सशोधनात वर्णनात्मक सशोधन पध्दतीचा उपयोग करून तथ्य संकलन केले आहे

**6 .0 संशोधनाची साधने**

सशोधनाची विविध साधने आहे . सदरील संशोधनात सशोधकांनी प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे . संशोधकानी प्रश्नावलीच्या माध्यमातुन स्पर्धा परिक्षेची तयारी करणा□ □ □ा विदयार्थाकडुन माहिती संकलन करून माहीतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे .

**7 .0 संशोधनाची नमुना निवड**

सदरील संशोधनात असंभव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतुक नमुना पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे . ज्यामध्ये औरंगाबाद जिल्यातील सर्व तालुक्यातील शहरी भागातील 40 विदयार्थी व ग्रामीण भागातील 40 विदयार्थाची निवड करून माहीती संकलन केले आहे .

**8 .0 संशोधनाचे निष्कर्ष**

1 . **100%** विदयार्थाना **स्पर्धा** परीक्षेची तयारी व अभ्यास ऑनलाईन पध्दतीने करणे सहज व सुलभ वाटते .
2 . **स्पर्धा** परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विदयार्थी ऑनलाईन अभ्यास पध्दतीस प्राधान्य देतात .
3 . **स्पर्धा** परीक्षेचा अभ्यास व शिकवणी वर्गातील शिक्षकाचे मार्गदर्शन ऑनलाईन स्वरूपात घ्यावे असे 100%विदयार्थाना वाटते .
4 . स्पर्धा परीक्षेचा अभ्यास ऑनलाईन माध्यामातुन करताना काही विदयार्थाना समस्या येतात .
5 . स्पर्धा परीक्षेचा अभ्यास ऑनलाईन पध्दतीने करताना नेटवर्क ,लॅपटॉप व भ्रमणध्वनी इत्यादी ऑनलाई न अभ्यास साधनाचा अभाव जाणवतो .

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

6. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास ऑनलाईन पध्दतीने करताना काही विदयार्थाना मोबाईवरील ऑनलाईन मार्गदर्शनात आवाजात चढ उतार, नेटवर्क खंडीत होणे, डॉऊनलोडींग समस्या ,स्वॉफ्टेअर सेटींग इत्यादी समस्या येतात .

7. स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी काही विदयार्थाकडे ऑनलाईन अभ्यासाच्या साधनांची कमतरता जाणवते .

8. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास ऑनलाईन पध्दतीने केल्यामूळे काही विदयार्थाना ऐकु कमी येणे, डोळयाची जळजळ होणे, चिड चिडेपणा, भीतीचा सामना करणे इत्यादी समस्या जाणवतात .

9. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास ऑनलाईन पध्दतीने केल्यामूळे शाररिक व मानसीक समस्याना काही विदयार्था ना सामोरे जावे लागते .

## 9.0 संदर्भ ग्रंथ सुची

***बापट भा गो (1995)*** *शैक्षणिक संशोधन, पुणे नुतन प्रकाशन*

***डॉ भिताडे वि रा (2007)*** *शैक्षणिक संशोधन पध्दती* ***पुणे, नुतन प्रकाशन .***

*माहीती संप्रेषण व तंत्रज्ञान ICT इयत्ता* ***10*** *वी* ***2013*** *महाराष्ट राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे .*

*www.shodhaganga.inflibnet.ac.in*

*स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र* ***2 डॉ किरण जी देसले*** *दिपस्तंभ प्रकाशन.*

***दैनिक लोकसत्ता .***

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*